गुरुवार, दि. ०३ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ०३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## मोती तलावावरील गणेश विसर्जन कुंडाची महापौर व उपमहापौरांकडून पाहणी

# गणेशभक्तांच्या सुविधांना प्राधान्य; स्वच्छता, पाणीपातळी व्यवस्थेबाबत निर्देश






**जालना । प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील गणेशमूर्ती विसर्जनाची प्रक्रिया सुरक्षित, शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडावी, यासाठी महानगरपालिका प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. गणेशोत्सवाच्या काळात मोती तलाव परिसरात मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन गणेशभक्तांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यावर महापालिका प्रशासनाने भर दिला आहे.

या अनुषंगाने महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे आणि उपमहापौर श्री. राजेशजी राऊत यांनी मोती तलाव परिसरातील गणेश विसर्जन कुंडाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विसर्जन कुंडाची सद्यस्थिती, परिसरातील स्वच्छता, पाणीपातळी, विद्युत व प्रकाश व्यवस्था, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना तसेच इतर मूलभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गणेशोत्सव काळात विसर्जनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण कराव्यात. विसर्जन प्रक्रियेदरम्यान गर्दीचे नियोजन, सुरक्षितता आणि स्वच्छता या बाबींना सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना महापौर व उपमहापौरांनी अधिकाऱ्यांना दिल्या. विसर्जन कुंड परिसरात मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ राहणार असल्याने संपूर्ण परिसरात नियमित आणि चोख स्वच्छता राखण्याच्या सूचना देण्यात आल्या. गणेशमूर्तींसोबत येणारे हार, फ ुले, दुर्वा व इतर पूजासाहित्य यामुळे परिसरात कचरा होऊ नये, यासाठी निर्माल्य संकलनाची स्वतंत्र आणि प्रभावी व्यवस्था उभारण्याचे निर्देश देण्यात आले. निर्माल्य नदी, तलाव किंवा जलस्रोतांमध्ये जाणार नाही, याची दक्षता घेऊन पर्यावरणपूरक विसर्जनाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या संबंधित विभागांनी नियोजन करावे, असेही स्पष्ट करण्यात आले. विसर्जन प्रक्रियेदरम्यान भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कुंडातील पाण्याची पातळी योग्य प्रमाणात ठेवणे आवश्यक असल्याने याबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. कुंड परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी आवश्यक सुरक्षाव्यवस्था आणि देखरेख ठेवण्यावर भर देण्यात आला.

विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांना विसर्जनाच्या वेळी त्रास होऊ नये, यासाठी परिसरातील व्यवस्थेचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गणेश विसजनासाठी रात्रीच्या वेळीही मोठ्या संख्येने भाविक येत असल्याने मोती तलाव परिसरातील प्रकाश व्यवस्थेचा प्रश्न महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे विद्युत विभागाने विसर्जन कुंड परिसरातील हायमास्ट लाईट्स कार्यरत ठेवावेत. आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त प्रकाश व्यवस्था उभारावी तसेच वीजपुरवठ्यात कोणताही व्यत्यय आल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटरची सुविधा उपलब्ध ठेवावी, असे निर्देश देण्यात आले. विसर्जन कुंडाकडे जाणारे मार्ग, वाहनतळ परिसर आणि भाविकांच्या ये-जा करण्याच्या ठिकाणी पुरेसा प्रकाश राहील, याची दक्षता घेण्यासही संबंधित विभागाला सांगण्यात आले. गणेशोत्सव काळात गर्दी वाढत असल्याने कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तत्काळ मदत मिळावी, यासाठी अग्निशमन दलाची आवश्यक साधनसामग्रीसह सज्जता ठेवण्याचे निर्दे श देण्यात आले. विसर्जनाच्या दिवशी परिस्थितीनुसार आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध ठेवण्याबाबतही सूचना करण्यात आल्या. विसर्जनाशी संबंधित आवश्यक परवानग्या व ना हरकत प्रमाणपत्राबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. मालमत्ता विभागाने नियम व अटी-शर्तींच्या अधीन राहून आवश्यकतेनुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' () देण्याची कार्यवाही वेळेत पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले.

गणेशोत्सव हा शहरातील सर्वांत मोठ्या सार्वजनिक उत्सवांपैकी एक असल्याने या काळात महापालिकेच्या विविध विभागांवर मोठी जबाबदारी राहणार आहे. स्वच्छता, विद्युत, अग्निशमन, मालमत्ता, वाहन, अभियांत्रिकी आणि इतर संबंधित विभागांनी परस्परांमध्ये योग्य समन्वय ठेवून काम करावे. विसर्जनाच्या दिवशी एखादी समस्या निर्माण झाल्यानंतर त्यावर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य अडचणींचा आधीच आढावा घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. भाविकांना रांगा, वाहतूक, स्वच्छता, प्रकाश अथवा सुरक्षेच्या कारणामुळे कोणतीही गैरसोय होणार

(पान २ वर)

---

# जालन्यात मराठा आंदोलक आक्रमक; धुळे - सोलापूर महामार्गावर रास्ता रोको

*** मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याने आंदोलकांचा संताप**

*** वडीगोद्री येथे जोरदार घोषणाबाजी, महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्काळीत**

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीत बिघाड झाल्याची माहिती समोर आल्यानंतर जालना जिल्ह्यातील मराठा आंदोलक आक्रमक झाले आहेत. सरकारने मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तातडीने ठोस निर्णय घ्यावा आणि



आंदोलनाची कोंडी सोडवावी, या मागणीसाठी बुधवारी (दि. २ सप्टेंबर) सकाळी वडीगोद्री येथे धुळेसोलापूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा बुधवारी पाचवा दिवस असून, उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावत असल्याची माहिती मिळाल्याने आंदोलकांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली. त्यांच्या प्रकृतीची चिंता व्यक्त करत सरकारने आणखी वेळ न दवडता मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर (पान २ वर)

---

# अभाविप जालना शहराची २०२६-२७ची कार्यकारिणी जाहीर

*शहराध्यक्षपदी प्रा. डॉ. नवनाथ हतवटे, तर शहरमंत्रीपदी अभिषेक खंडेकर*

**जालना - प्रतिनिधी**

: शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) जालना शहर शाखेची २०२६-२७ या वर्षाची शहर कार्यकारिणी १ सप्टेंबर रोजी घोषित करण्यात आली. 'ज्ञानशीलएकता' या त्रिसूत्रीवर कार्य करणाऱ्या अभाविपच्या नव्या कार्यकारिणीत शहराध्यक्षपदी प्रा. डॉ. नवनाथ हतवटे, तर शहरमंत्रीपदी अभिषेक खंडेकर यांची घोषणा




करण्यात आली.

यावेळी छत्रपती संभाजीनगर विभाग संघटनमंत्री श्री. मंगेश ढगे तसेच जिल्हाप्रमुख प्रा. वैभव अंबरवाडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

नवीन कार्यकारिणीत शहर उपाध्यक्षा म्हणून प्रा. शारदा दहीभाते यांची निवड करण्यात आली. शहर सहमंत्री म्हणून निखिल तांबे, सहमंत्री समर्थ काळे, संयोजक प्रेम कांबळे, सहसंयोजक,प्रणव मानकर, रविकांत बोरकर, थिंक इंडिया संयोजक साहिल माटे, थिंक इंडिया सहसंयोजक जोशवीरसिंग रेहान,राष्ट्रीय कला मंच संयोजक वैभव काळे,जिज्ञासा संयोजक उमेश भोसले, संयोजक प्रणुल देशपांडे (पान २ वर)

---

# सिद्धिविनायकाला साकडे; मुख्यमंत्र्यांची थेट भेट घेत ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी शिष्टमंडळाचा आग्रह

## अमृत व परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याची खंत

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाच्या गेल्या अनेक वर्षांपासून शासन दरबारी प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी ब्राह्मण समाजाच्या विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. श्रावण महिन्यातील सोमवार व संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने मुंबई येथील श्री सिद्धिविनायक मंदिरात दर्शन घेऊन महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित मागण्या तातडीने मार्गी लागाव्यात, यासाठी श्री सिद्धिविनायकाला साकडे घालण्यात आले. त्यानंतर मंत्रालयात झालेल्या कॅबिनेट बैठकीनंतर शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची थेट भेट



घेऊन समाजाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

अखिल भारतीय पेशवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन वाडे पाटील, परशुराम हिंदू सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष विश्वजीत देशपांडे आणि अखिल भारतीय सकल ब्राह्मण महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय कुलकर्णी (सुपेकर) यांच्या नेतृत्वाखाली हे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटले.

ब्राह्मण समाजाच्या मागण्यांसाठी करण्यात आलेल्या या उपक्रमात 'आधी सिद्धिविनायक आणि नंतर बुद्धिविनायक' अशी संकल्पना मांडण्यात आली. श्री सिद्धिविनायकाच्या चरणी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांच्या पूर्ततेसाठी प्रार्थना केल्यानंतर थेट मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर हे प्रश्न मांडण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र, अनेक मागण्या अद्यापही प्रलंबित असल्याने समाजामध्ये नाराजी असल्याचे शिष्टमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

महाराष्ट्र शासनाने ब्राह्मण समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या उद्देशाने गेल्या दोन-तीन वर्षांत अमृत महामंडळ तसेच परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले आहे. या महामंडळांच्या माध्यमातून समाजातील आर्थिकदृष्ट्या गरजू घटकांना विविध योजनांचा लाभ मिळणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात या योजनांचा अपेक्षित वेगाने आणि प्रभावीपणे लाभ समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याची खंत शिष्टमंडळाने व्यक्त केली. महामंडळे आणि त्यांच्याशी संबंधित योजना कागदोपत्री अस्तित्वात असल्या तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. योजनांची माहिती, लाभ मिळविण्याची प्रक्रिया, निधीची उपलब्धता आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा प्रत्यक्ष लाभ पोहोचविण्याच्या यंत्रणेबाबत अधिक पारदर्शकता (पान २ वर)

---

# मराठा समाजाच्या मागण्यांच्या समर्थनार्थ आज जालना जिल्हा बंदचे आवाहन

*व्यापारी, दुकानदार व व्यावसायिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होण्याचे आवाहन; बंद शांततेत व कायद्याचे पालन करून करण्याचे आवाहन*

**जालना । प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी जालना जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले आहे. या बंदमध्ये जालना शहरातील व्यापारी, दुकानदार तसेच विविध व्यावसायिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यासंदर्भात विश्वंभर तिरुखे, प्रशांत वाढेकर आणि गणेश शिंदे यांनी जालना शहरातील व्यापारी बांधव, दुकानदार व व्यावसायिक बंधू-भगिनींना पत्राद्वारे बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेल्या संघर्षाला व्यापक जनसमर्थन मिळावे, तसेच समाजाच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले जावे, या उद्देशाने जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या बंदच्या माध्यमातून समाजाची एकजूट आणि शांततापूर्ण पद्धतीने मागण्यांसाठी दिला जाणारा पाठिंबा अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जालना शहरातील व्यापारी बांधवांनी आपल्या दुकाने व व्यावसायिक आस्थापना स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून जिल्हा बंदमध्ये सहभागी व्हावे, अशी विनंती करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारची सक्ती न करता समाजाच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा म्हणून एक दिवस व्यवसाय बंद ठेवून संघर्षात योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. व्यापारी वर्ग हा शहराच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनातील महत्त्वाचा घटक असल्याने त्यांच्या सहभागातून बंदला व्यापक स्वरूप प्राप्त होऊ शकते. त्यामुळे व्यापारी, दुकानदार आणि विविध व्यावसायिकांनी समाजहिताचा विचार करून या आवाहनाला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ''आपला व्यवसाय, आपला समाज आणि आपले भविष्य यांचा विचार करून या संघर्षाच्या काळात एक दिवस समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी योगदान द्यावे,'' असे आवाहन पत्रातून करण्यात आले (पान २ वर)

# संपादकीय पान

## सात दिवसांचा अहवाल पुरेसा नाही; जालन्याच्या शिक्षणव्यवस्थेला सातत्यपूर्ण कृतीची गरज!

शाळांच्या भिंती रंगवण्यापासून डिजिटल वर्गांपर्यंत आणि 'जालनाई सिल्क'च्या ब्रँडिंगपर्यंत; पालकमंत्र्यांच्या बैठकीतील निर्णयांची खरी परीक्षा अंमलबजावणीत आहे. जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, कंपाऊंड वॉल, क्रीडांगणे आणि इतर मूलभूत सुविधांची सद्यस्थिती सात दिवसांत सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले आहेत. वरकरणी पाहता हा नियमित प्रशासकीय आढावा वाटू शकतो. मात्र, या बैठकीतील निर्णयांचा बारकाईने विचार केला तर जालना जिल्ह्याच्या शैक्षणिक व्यवस्थेसमोर असलेली मोठी आव्हाने आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी आवश्यक असलेली दिशा स्पष्ट होते.
शाळेच्या इमारतीची अवस्था खराब असल्याचे अहवालात नमूद झाले, वर्गखोली दुरुस्तीची गरज असल्याचे निदर्शनास आले, स्वच्छतागृहाची कमतरता आढळली किंवा पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले, तर त्यानंतरची कार्यवाही किती वेगाने होते, हेच प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे खरे मोजमाप ठरणार आहे.
शाळा दुरुस्तीचा निधी उपलब्ध असूनही निविदा किंवा प्रशासकीय प्रक्रियेच्या विलंबामुळे तो अखर्चित राहणे ही केवळ प्रशासकीय त्रुटी नाही. त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर होतो. एखाद्या शाळेची वर्गखोली धोकादायक असेल, छत गळत असेल, स्वच्छतागृह वापरण्यायोग्य नसेल किंवा पिण्याचे पाणी उपलब्ध नसेल, तर डिजिटल शिक्षण, स्मार्ट क्लास किंवा आकर्षक रंगरंगोटी यांचा उपयोग किती?
म्हणूनच विकासाचा क्रम ठरविताना 'मूलभूत सुविधा प्रथम, आधुनिक सुविधा त्यानंतर' हे तत्त्व स्वीकारणे गरजेचे आहे. निधी अखर्चित राहू नये, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, ही भूमिका योग्य आहे. मात्र जबाबदारी निश्चित करण्याबरोबरच प्रत्येक कामासाठी स्पष्ट अंतिम मुदत, जबाबदार अधिकारी आणि प्रगतीचे सार्वजनिक परीक्षण आवश्यक आहे. अन्यथा 'कालबद्ध आराखडा' हा आणखी एक प्रशासकीय शब्द ठरू शकतो. आदर्श शाळेची संकल्पना आज अनेकदा रंगरंगोटी, सुंदर भित्तिचित्रे आणि डिजिटल स्क्रीनपुरती मर्यादित केली जाते. पालकमंत्र्यांनी मात्र वाचनालय, किचन गार्डन, हरित कुंपण, वृक्षारोपण, सीसीटीव्ही, अखंडित वीजपुरवठा आणि डिजिटल वर्गखोल्यांचा समावेश असलेली व्यापक संकल्पना मांडली आहे. ही दिशा महत्त्वाची आहे. मात्र आदर्श शाळेची खरी ओळख तिच्या इमारतीपेक्षा विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गुणवत्तेत असते. डिजिटल बोर्ड बसविला म्हणून शिक्षण डिजिटल होत नाही. इंटरनेट उपलब्ध करून दिले म्हणून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळत नाही. शिक्षकांना डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करता येतो का, विद्यार्थ्यांना त्यातून प्रत्यक्ष ज्ञान मिळते का आणि त्यांचे शैक्षणिक परिणाम सुधारतात का, हे अधिक महत्त्वाचे आहे. म्हणूनच जालन्यातील आदर्श शाळांचा आराखडा तयार करताना 'इमारत + तंत्रज्ञान + शिक्षक + विद्यार्थी + वाचनसंस्कृती + क्रीडा + मूल्यशिक्षण' या सर्वांचा एकत्रित विचार व्हायला हवा.
शाळांच्या भिंतींवर पंचतंत्र, संत-महापुरुष, सामाजिक ऐक्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांची चित्रे काढण्याची सूचना स्वागतार्ह आहे. परंतु या चित्रांचा संदेश विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाशी जोडला गेला पाहिजे.
भिंतीवर 'समता' लिहून उपयोग नाही, जर शाळेच्या वातावरणात भेदभावाला जागा असेल. वैज्ञानिक दृष्टिकोनाचे चित्र काढून उपयोग नाही, जर प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्याला गप्प केले गेले. सामाजिक सलोख्याचा संदेश रंगवून उपयोग नाही, जर विविधतेचा आदर प्रत्यक्ष व्यवहारात शिकवला गेला नाही.
म्हणून शाळेची भिंत ही केवळ सजावटीची जागा नसून ती मूल्यशिक्षणाचे माध्यम बनली पाहिजे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्या भिंतीवर लिहिलेला संदेश शाळेच्या दैनंदिन संस्कृतीत दिसला पाहिजे.
जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये मैदान उपलब्ध असले तरी त्याचा नियमित वापर होत नाही, ही वस्तुस्थिती असेल तर ती गंभीर बाब आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ हा अभ्यासाइतकाच महत्त्वाचा आहे. खो-खो, कबड्डी, मल्लखांब, बॅडमिंटन यांसारख्या खेळांसाठी मूलभूत सुविधा निर्माण करण्याची सूचना योग्य आहे. पण मैदान तयार करून त्यावर गवत वाढणे किंवा साहित्य खरेदी करून ते कपाटात पडून राहणे हा विकास नव्हे. प्रत्येक शाळेसाठी क्रीडा वापराचे वार्षिक नियोजन, प्रशिक्षकांची उपलब्धता, क्रीडा साहित्याचा वापर आणि विद्यार्थ्यांचा सहभाग यांचेही मोजमाप झाले पाहिजे. शाळांच्या परिसरातील तंबाखू-मद्य संस्कृतीवर कठोर नजर हवी शाळांमध्ये तंबाखू किंवा मद्याचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध कारवाईसाठी पथक तयार करण्याच्या सूचनाही महत्त्वाच्या आहेत. शाळेच्या आसपासचे वातावरण विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक विकासावर परिणाम करते. शाळेच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असेल, तर केवळ शाळेतील जनजागृती पुरेशी नाही. संबंधित स्थानिक प्रशासन, पोलीस आणि आरोग्य यंत्रणांनी संयुक्तपणे प्रतिबंधात्मक कारवाई करणे आवश्यक आहे.
विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा धडा वर्गात शिकवताना शाळेच्या बाहेरच व्यसनांचे सहज उपलब्ध असलेले जग दिसत असेल, तर संदेशातील विसंगती विद्यार्थ्यांच्या लक्षात येते. जालना शहरातील महापालिकेच्या १६ शाळांचा विद्यार्थीसंख्या, इमारतींची अवस्था, झोपडपट्टी व वंचित वस्त्यांचे भौगोलिक वास्तव आणि विद्यार्थ्यांचा शाळेपर्यंत पोहोचण्याचा वेळ या निकषांवर अभ्यास करण्याची सूचना अत्यंत महत्त्वाची आहे.
कारण शहराचा विस्तार झाला असला तरी शिक्षणाच्या सुविधा नेहमी त्याच वेगाने वाढलेल्या नसतात.

## उपोषण हाच उपाय का? आणि घटनात्मक मार्गांचे भान

महाराष्ट्रात आज एकच चित्र दिसत आहे - मागणी मान्य करून घ्यायची असेल तर उपोषणाला बसा. मराठा आरक्षण, शेतकरी प्रश्न, कर्मचारी मागण्या असो, प्रत्येकाला वाटते उपोषण केल्याशिवाय सरकार ऐकणार नाही. आणि दुर्दैवाने ते खरंही ठरत आहे.
पण या उपोषणाच्या संस्कृतीत सर्वात जास्त भरडला जातो तो म्हणजे सामान्य पोलीस कर्मचारी आणि त्याचे कुटुंब.
एखादे मोठे उपोषण सुरु झाले की, १२-१२ तास बंदोबस्त, उन्हात-पावसात उभे राहणे, जेवण नाही, झोप नाही. वरिष्ठांचा दबाव आणि आंदोलकांचा रोष या मध्ये पोलीस कर्मचारी भरडला जातो. तोही माणूस आहे, त्यालाही कुटुंब आहे, सण आहेत. पण त्याच्या हालअपेष्टांकडे कोणीही पाहत नाही.
या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान सभेतील २५ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणाची आठवण होते. बाबासाहेब म्हणाले होते -
''जिथे घटनात्मक मार्ग खुले आहेत, तिथे सत्याग्रह, असहकार, उपोषण या पद्धती अराजकतेचे व्याकरण आहे.''
बाबासाहेबांचा विश्वास होता की संविधान लागू झाल्यावर कोणालाही हक्कासाठी उपोषणाची गरज पडणार नाही, कारण न्यायालय, विधिमंडळ, प्रशासन असे घटनात्मक मार्ग खुले असतील. आज दोन्ही बाजूंनी विचार करण्याची गरज आहे.

**१. सरकारची जबाबदारी:**
घटनात्मक मार्ग फक्त कागदावर न ठेवता प्रत्यक्षात कार्यान्वित करावेत. वेळेत निर्णय झाले तर उपोषणाची वेळच येणार नाही.

**२. जनतेची जबाबदारी:**
प्रत्येक मागणीसाठी उपोषण हे पहिले अस्त्र बनवू नये. यामुळे पोलीस यंत्रणेवर ताण येतो, सामान्य वाहतूक आणि कायदा-सुव्यवस्था कोलमडते. उपोषण हा शेवटचा उपाय असावा. पहिला उपाय हा घटनात्मकच असला पाहिजे - माहिती अधिकार, जनहित याचिका, कायदेशीर नोटीस, लोकप्रतिनिधींना जाब विचारणे.
सरकारने घटनात्मक मार्ग गतिमान करावेत आणि नागरिकांनीही कायदेशीर मार्गावर विश्वास ठेवून पोलिसांसारख्या घटकाला विनाकारण त्रास होणार नाही याचे भान ठेवावे, तरच बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण होईल.

**ॲड. महेश धन्रावत, जालना**
**मो. ९३२६७०४६४७**

## जालना शहरातील आसराबाई गोर्डे यांचे निधन

**जालना - प्रतिनिधी-** जालना शहरातील शिवनगर भागातील आसराबाई माणिकराव गोर्डे (८५) यांचे २ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता वृध्दापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शहरातील प्रभाग १४ मधील नगरसेविका सुलोचना लक्ष्मण गोर्डे यांच्या त्या सासू होत.



त्यांच्या पार्थीवावर शोकाकूल वातावरणात रामतीर्थ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. या अंत्यसंस्काराला उपस्थित असलेले आमदार नारायण कुचे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी आजींची आठवण म्हणून प्रत्येकाने एका वृक्षाची लागवड करावी, असे आवाहन केले आहे. अंत्यसंस्काराला उपस्थित असलेल्यांनी पसायदानानंतर वृक्ष लागवड करण्याची शपथ घेतली आहे.

## ८८८ फाऊंडेशनच्या अध्यक्षा कल्याणी ताई तौर यांनी केले, भूमी पवारचे कौतुक, गुणगौरव

**जालना (प्रतिनिधी) :** जालना येथील कु. भूमी विकी पवार हिने आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याची चमक दाखवत १७ व्या कुडो राज्यस्तरीय व ७ व्या मेयर्स कप स्पर्धेत दोन रौप्यपदकांची कमाई केली आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जालना येथील ८८८ फाउंडेशन च्या अध्यक्षा. कल्याणी ताई तौर यांनी भूमी विकी पवार हिचे कौतुक व गुणगौरव करण्यात आला.भूमी पवार हिने कुडो या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत दोन रौप्यपदके पटकावून जालना शहराचे नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या या यशाबद्दल
कल्याणी ताई तौर गजानन भाऊ तौर ८८८ फाऊंडेशन मित्र मंडळ, यांनी तिचे अभिनंदन करून तिच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचे कौतुक केले. यावेळी गोविंद जामदार, विकी पवार व मित्र मंडळ उपस्थित होते.

## पान १ व ४ वरुन...

### मोती तलावावरील...

नाही, याची दक्षता घ्यावी, असे महापौर व उपमहापौरांनी स्पष्ट केले. मोती तलावावरील पाहणीनंतर महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे, उपमहापौर श्री. राजेशजी राऊत आणि आयुक्त अंजली शर्मा यांनी महापालिका कार्यालयात संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत गणेशोत्सवाच्या अनुषंगाने विविध विभागांकडून करण्यात येणाऱ्या तयारीचा आढावा घेण्यात आला.
यावेळी स्वच्छता व निर्माल्य संकलन, विसर्जन कुंडातील पाणीपातळी, प्रकाश व्यवस्था, जनरेटर, अग्निशमन यंत्रणा, आवश्यक , परिसरातील मूलभूत सुविधा आणि विभागांमधील समन्वय या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या निश्चित करून त्यानुसार नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांचा उत्साह आणि श्रद्धा कायम ठेवतानाच सुरक्षितता व पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिका प्रशासनाने सर्वतोपरी तयारी करावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले. या पाहणी व बैठकीस नगरसचिव केशव कानपुडे, स्वच्छता व अतिक्रमण सहाय्यक आयुक्त विजय फ लंब्रीकर, नगर अभियंता सय्यद सऊद, विद्युत अभियंता कोमल गावंडे, अग्निशमन अधिकारी पानपट्टे, मालमत्ता अधीक्षक राजेश चंदनशिवे, शहर स्वच्छता प्रमुख सुधीर डहाळे, वाहन शाखा प्रमुख अशोक कटारे यांच्यासह महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने विसर्जनस्थळांच्या व्यवस्थेला सुरुवात केल्याने आगामी काळात शहरातील इतर विसर्जनस्थळांवरही स्वच्छता, सुरक्षा आणि मूलभूत सुविधांची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

### जालन्यात मराठा...

निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.बुधवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास वडीगोद्री परिसरात मराठा समाजातील आंदोलक मोठ्या संख्येने एकत्र आले. आंदोलकांनी धुळेसोलापूर महामार्गावर ठिय्या देत रास्ता रोको केला. यावेळी सरकारच्या भूमिकेविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची सरकारने तातडीने दखल घ्यावी, त्यांच्या प्रकृतीकडे गांभीर्याने पाहावे आणि मराठा आरक्षणाच्या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली.
रास्ता रोको आंदोलनामुळे धुळेसोलापूर महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. महामार्गावर आंदोलक मोठ्या संख्येने जमा झाल्याने दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागल्या. प्रवासी वाहने, मालवाहू वाहने तसेच इतर वाहनांना काही काळ पुढे जाता न आल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला.
आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महामार्गावरील परिस्थितीवर पोलिसांनी लक्ष ठेवले. वाहतूक सुरळीत करण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला.
रास्ता रोकोची माहिती मिळताच पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आंदोलकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला. आंदोलन शांततेच्या मार्गाने पार पाडावे आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहील, यासाठी पोलिसांकडून आवाहन करण्यात आले.
दरम्यान, आंदोलकांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न केवळ आश्वासनांवर न ठेवता त्यावर ठोस निर्णय घेण्याची मागणी केली. जरांगे पाटील यांच्या प्रकृतीकडे सरकारने दुर्लक्ष करू नये, अशी भावनिक भूमिकाही आंदोलकांनी व्यक्त केली.
मराठा आरक्षणाचा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असून, आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरू आहे. अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणामुळे आंदोलनाला पुन्हा वेग आला आहे. उपोषणाचा पाचवा दिवस सुरू असताना त्यांची प्रकृती खालावत असल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने हस्तक्षेप करून मराठा समाजाच्या मागण्यांवर तोडगा काढावा, अशी मागणी वडीगोद्रीतील आंदोलकांनी केली.
मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला. जरांगे पाटील यांच्या प्रकृतीत आणखी बिघाड झाल्यास त्याची जबाबदारी सरकारची राहील, अशी संतप्त भावना आंदोलकांनी व्यक्त केली.
वडीगोद्रीतील रास्ता रोकोमुळे जालना जिल्ह्यातील मराठा आंदोलनाला पुन्हा आक्रमक वळण मिळाल्याचे चित्र दिसून आले. सरकारकडून पुढील काळात कोणती भूमिका घेतली जाते आणि मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर काय निर्णय होतो, याकडे आता आंदोलकांसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### अभाविप जालना...

खेलो भारत संयोजक पवन वाघमारे, व्स्था प्रमुख भानुदास डोबाले, कार्यकारणी सदस्य प्रा. बाबासाहेब वाघ, अभिषेक काळे, प्रणव साने या विविध जबाबदाऱ्या कार्यकर्त्यांची सोपावण्यात आल्या.यावेळी उपस्थित जिल्हा संयोजक गणेश बोंडे, अजित उबाळे,पवन सोनवणे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.
अभाविपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांसोबतच सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रहिताच्या विषयांवर सातत्याने काम केले जाते. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून जालना शहरातील विद्यार्थ्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडून संघटनात्मक कार्य अधिक गतिमान करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

### मराठा समाजाच्या...

आहे. बंदच्या माध्यमातून मराठा समाजाच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविण्यासोबतच समाजामध्ये एकजूट निर्माण करण्याचा संदेश देण्याचा प्रयत्न असल्याचे आवाहनकर्त्यांनी म्हटले आहे. व्यापारी बांधवांनी आपली दुकाने व आस्थापने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.
जिल्हा बंदच्या पार्श्वभूमीवर शांतता, शिस्त आणि कायद्याचे पालन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. बंद शांततेत पार पाडावा आणि कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहन पत्रात करण्यात आले आहे. ''शांतता राखा, एकजूट दाखवा आणि संघर्षाला बळ द्या,'' असा संदेश देत बंद यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.
दरम्यान, ३ सप्टेंबर रोजी जिल्हा बंदच्या आवाहनाला शहरातील व्यापारी व व्यावसायिकांकडून कितपत प्रतिसाद मिळतो, याकडे लक्ष लागले आहे. बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठा, दुकाने आणि व्यावसायिक आस्थापनांमध्येही याबाबत चर्चा सुरू झाली आहे.
जालना शहरातील व्यापारी बांधव, दुकानदार आणि व्यावसायिक बंधू-भगिनींनी कोणत्याही दबावाला बळी न पडता स्वयंस्फूर्तीने व शांततेच्या मार्गाने बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन विश्वंभर तिरुखे, प्रशांत वाढेकर आणि गणेश शिंदे यांनी केले आहे. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी सुरू असलेल्या संघर्षाला व्यापारी वर्गाच्या माध्यमातून पाठिंबा मिळावा आणि समाजाची एकजूट अधोरेखित व्हावी, या उद्देशाने हे आवाहन करण्यात आले आहे.

### सिद्धिविनायकाला साकडे...

व गतिमानता आवश्यक असल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले.
ब्राह्मण समाजासाठी निर्माण करण्यात आलेल्या महामंडळांच्या माध्यमातून समाजाच्या आर्थिक उन्नतीला चालना मिळणे अपेक्षित असताना, योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कथित राजकारण होत असल्याचा आरोप शिष्टमंडळाने केला. या योजनांचा लाभ कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय पात्र लाभार्थ्यांना मिळावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.
महामंडळांच्या माध्यमातून शिक्षण, व्यवसाय, स्वयंरोजगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदत करण्याच्या दृष्टीने अधिक प्रभावी योजना राबविण्याची गरज असल्याचेही शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.
ब्राह्मण समाजाच्या विविध जिव्हाळ्याच्या मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून शासन दरबारी प्रलंबित आहेत. या मागण्यांवर केवळ आश्वासने न देता त्याबाबत ठोस निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी, अशी आग्रही भूमिका शिष्टमंडळाने मांडली.
समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी लाभ मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढवून प्रलंबित प्रश्नांना कालमर्यादेत मार्गी लावावे, अशी मागणीही करण्यात आली.
शिष्टमंडळाने मांडलेल्या विविध मागण्या आणि गंभीर प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मकपणे ऐकून घेतल्याचे शिष्टमंडळाच्या वतीने सांगण्यात आले. समाजाच्या विविध प्रश्नांमध्ये आपण स्वतः लक्ष घालू, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाला दिल्याची माहिती यावेळी देण्यात आली.
त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी आता शासन पातळीवर ठोस हालचाली सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.
ब्राह्मण समाजाच्या विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतलेली ही थेट भेट महत्त्वपूर्ण मानली जात आहे. समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासाशी संबंधित प्रश्न, महामंडळांच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रलंबित मागण्यांवर निर्णय या विषयांवर शिष्टमंडळाने थेट मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला.
मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नांकडे स्वतः लक्ष देण्याचे आश्वासन दिल्यामुळे ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित मागण्यांना आता गती मिळेल, अशी अपेक्षा शिष्टमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. मात्र, या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत आणि किती वेगाने होते, याकडे आता समाजाचे लक्ष लागले आहे.

### रोटरी क्लबच्या...

क्षयरोगाच्या उपचारामध्ये नियमित औषधोपचारासोबत रुग्णांचे पोषणही अत्यंत महत्त्वाचे आहे. रोटरी क्लब ऑफ जालनाने 'प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियान'मध्ये सक्रिय सहभाग नोंदवून ६०० क्षयरुग्णांना प्रोटीनयुक्त कोरडा पोषण आहार उपलब्ध करून दिल्याने रुग्णांना मोठा लाभ होणार आहे. क्षयरुग्णांच्या उपचार प्रक्रियेला पोषणाच्या माध्यमातून आधार देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असून, भविष्यातही एस.आर. जी. पित्ती स्टील आणि रोटरी क्लब ऑफ जालना यांनी या अभियानासाठी योगदान सुरू ठेवावे, असे आवाहन डॉ. कुडलीकर यांनी केले. तसेच या सामाजिक उपक्रमासाठी त्यांनी रोटरी क्लब आणि एस.आर.जे. पित्ती स्टीलचे आभार मानले.
कार्यक्रमास डॉ. रमेश काकड, डॉ. परशुराम नागदरवाड, वैद्यकीय अधिकारी, एनटीईपी कर्मचारी, उपचाराखाली असलेले क्षयरुग्ण तसेच त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

### डॉ. भताने'ज...

उपक्रम राबविणारे डॉ. भताने'ज छाया फाउंडेशन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सातत्याने कार्यरत आहे. जिल्हा कारागृहातील या वैद्यकीय उपक्रमातून ''आरोग्यसेवा सर्वांसाठी'' हा फाउंडेशनचा संकल्प अधोरेखित झाला.

### छत्रपती संभाजीनगर...

डाक सेवेशी संबंधित प्रलंबित अथवा निवारण न झालेल्या तक्रारी असलेल्या नागरिकांनी निर्धारित मुदतीत तक्रारी सादर करून डाक अदालतीच्या माध्यमातून त्यांचे निराकरण करून घेण्याचे आवाहन प्रवर अधीक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी केले आहे.

### शहापूर व धाकलगाव...

करतात. मात्र,या दोन्ही महत्त्वाच्या गावांमध्ये जलद बसेस थांबत नसल्यामुळे प्रवाशांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे.नाईलाजास्तव नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून यामुळे वेळेचा अपव्यय आणि मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.विशेषतः शाळा-महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून महिला व ज्येष्ठ नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे.
निवेदनातील प्रमुख मागण्या पुढील प्रमाणे केल्या आहेत.
शहापूर येथे जालना आणि बीडकडे जाणाऱ्या सर्व योग्य जलद एस.टी.बसेसना अधिकृत थांबा तातडीने मंजूर करण्यात यावा.
धाकलगाव येथेही दोन्ही बाजूंनी धावणाऱ्या जलद बसेसना अधिकृत थांबा देण्यात यावा. प्रत्यक्ष प्रवासी व विद्यार्थ्यांची संख्या तसेच स्थानिक गरजेचा आढावा घेण्यासाठी महामंडळाने तातडीने स्थळ पाहणी व सर्वेक्षण अहवाल तयार करावा.
प्रवासी सोयीनुसार बसेसचे वेळापत्रक व थांबे निश्चित करण्यात यावेत.प्रशासनाने यावर तात्काळ सकारात्मक कार्यवाही करून केलेल्या उपाययोजनांची लेखी माहिती द्यावी. भारतीय राज्यघटनेतील समानतेच्या तत्त्वानुसार ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित,सुलभ आणि परवडणारी सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे हे एस.टी.महामंडळाचे कर्तव्य आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.
सदर निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते राधाकिसन मैंद,शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजू विजय छल्लारे,मंगेश मुंढे,गणेश पवार,तान्हाजी धुमाळ,लक्ष्मण भडांगे यांच्यासह परिसरातील नागरिक व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.
प्रशासनाने प्रवाशांच्या या रास्त मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

# पावसाळ्यातही धान्यपुरवठा सुरळीत राहणार; ऑगस्ट ते ऑक्टोबरचे धान्य महिनानिहाय वितरण

## केंद्र शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय; ई-पॉसच्या अडचणी टाळण्यासाठी एकत्रित वाटपाऐवजी दरमहा स्वतंत्र वितरणास मंजुरी

जालना । प्रतिनिधी आगामी पावसाळा तसेच त्यानंतर उद्भवू शकणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अन्नधान्याचा सुरळीत पुरवठा सुरू राहावा, यासाठी केंद्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीतील अन्नधान्याचा आगाऊ साठा उपलब्ध करून देऊन त्याचे लाभार्थ्यांना ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वितरण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी सुरू असून, जालना जिल्ह्यातही लाभार्थ्यांना वेळेत अन्नधान्य मिळावे यासाठी प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

**तीन महिन्यांचा धान्यसाठा आगाऊ उपलब्ध**

पावसाळ्यात अतिवृष्टी, पूरस्थिती किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे अन्नधान्याच्या वाहतुकीमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील लाभार्थ्यांना धान्य मिळण्यात अडचणी येऊ नयेत, यासाठी केंद्र शासनाने तीन महिन्यांचा अन्नधान्य साठा आगाऊ उचलण्याचा निर्णय घेतला.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२६ या कालावधीतील धान्याचा साठा आगाऊ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने राज्य शासन व संबंधित यंत्रणांकडून कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे पावसाळ्यात पुरवठा साखळीत अडथळे आले तरी लाभार्थ्यांना धान्य उपलब्ध करून देणे प्रशासनाला शक्य होणार आहे.

तीन महिन्यांचे अन्नधान्य एकाच वेळी ई-पॉस मशीनद्वारे लाभार्थ्यांना वितरित करण्याची प्रक्रिया राबविताना राज्यातील विविध घटकांकडून होणाऱ्या कार्यात्मक विलंबामुळे अडचणी निर्माण होत असल्याचे यापूर्वी निदर्शनास आले होते.

रास्तभाव दुकानांमध्ये ई-पॉस प्रणालीद्वारे धान्य वितरण करताना एकाच वेळी तीन महिन्यांचा साठा वितरित करण्याची प्रक्रिया तांत्रिक तसेच कार्यपद्धतीच्या दृष्टीने अडचणीची ठरू शकते. त्यामुळे ऑगस्ट ते ऑक्टोबर या तीन महिन्यांचे धान्य एकत्रितपणे वितरित न करता प्रत्येक महिन्याचे धान्य स्वतंत्रपणे वितरित करण्याची परवानगी केंद्र शासनाकडे मागण्यात आली होती.

राज्य शासनाच्या या मागणीची केंद्र शासनाने दखल घेतली आहे. दि. २२ जुलै २०२६ रोजीच्या पत्राद्वारे ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीतील अन्नधान्याचे दरमहा स्वतंत्रपणे वितरण करण्यास आवश्यक त्या मुदतीत मंजुरी देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत लाभार्थ्यांना धान्य वितरण करताना ई-पॉस प्रणालीसमोरील संभाव्य अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच लाभार्थ्यांना त्यांच्या नियोजित महिन्याचे धान्य स्वतंत्रपणे मिळण्याचा मार्गही सुकर झाला आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यातील संपूर्ण अन्नधान्य महिनानिहाय गोदामांमध्ये पोहोचविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. गोदामांमध्ये धान्य उपलब्ध झाल्यानंतर तेथून थेट वाहतूक करून संबंधित रास्तभाव दुकानांमध्ये वितरित करण्यात आले आहे.

यामुळे जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरळीत ठेवण्यास मदत होणार असून, पावसाळ्यात वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाल्यास त्याचा लाभार्थ्यांच्या धान्य वितरणावर परिणाम होऊ नये, यासाठी प्रशासनाने पुरवठा साखळीचे नियोजन केले आहे.

दरमहा स्वतंत्र वितरणाच्या निर्णयामुळे लाभार्थ्यांना तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी घेण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही. संबंधित महिन्याचे धान्य उपलब्ध झाल्यानंतर ई-पॉस प्रणालीद्वारे नियमित वितरणाची प्रक्रिया सुरू राहणार आहे.

पावसाळ्याच्या कालावधीत धान्य वाहतुकीत अडथळे येण्याची शक्यता लक्षात घेता आगाऊ उचल आणि गोदामांमध्ये साठा उपलब्ध ठेवण्याचा निर्णय लाभार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत मोठ्या संख्येने लाभार्थी सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अवलंबून आहेत. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती किंवा अतिवृष्टीच्या काळातही या व्यवस्थेत खंड पडू नये, यासाठी शासनाकडून आगाऊ नियोजन केले जात आहे.

जिल्ह्यात धान्य गोदामांपर्यंत पोहोचविणे, तेथून रास्तभाव दुकानांमध्ये वाहतूक करणे आणि त्यानंतर ई-पॉस प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना वितरण करणे, या संपूर्ण प्रक्रियेवर संबंधित यंत्रणांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या नव्या मंजुरीमुळे तीन महिन्यांचे धान्य एकत्रित वितरण करण्यामुळे निर्माण होणाऱ्या तांत्रिक व कार्यात्मक अडचणी टाळता येणार असून, ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीत लाभार्थ्यांना महिनानिहाय अन्नधान्य उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अधिक सुरळीत होण्याची शक्यता आहे.

पावसाळा आणि संभाव्य नैसर्गिक आपत्तींच्या काळातही गरीब व गरजू लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा अखंडित ठेवण्यासाठी प्रशासनाने पुरवठा व्यवस्थेला प्राधान्य दिले आहे.

# Gen-Z च्या भविष्यासाठी कक्कया समाजाचा निर्धार, ६ सप्टेंबरला धारावीत भव्य युवा संवाद

**मुंबई -दत्ता खंदारे/प्रतिनिधी**

समाजातील - तरुणांची एकजूट निर्माण करून त्यांना करिअर व विचारांना चालना देण्यासाठी संत कक्कया विकास संस्था, धारावीच्या वतीने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून येत्या रविवार दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्री गणेश विद्या मंदिर, धारावी येथे कक्कया युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

समाजातील विविध क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी व सुशिक्षित बेरोजगार तरुणांना एकत्र आणून योग्य मार्गदर्शन करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून यामध्ये , , , पोलीस भरती, लेखा परीक्षण, , , परदेशात शिक्षणासाठी शासकीय प्रवेश, इंजिनिअरिंग क्षेत्रातील खासगी कंपन्यांमधील नोकरीच्या संधी, व्यवसायासाठी शासकीय कर्ज व बँकिंग स्पर्धा परीक्षा, तसेच फिल्म, म्युझिक, नाटक, गायन, डान्स, बॉलिवूड आणि क्रीडा क्षेत्रातील करिअरसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाणार आहे. पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलांची भविष्यासाठी नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले असून या कार्यक्रमात कक्कया समाजातील - तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित



राहून आपल्या मनातील भावना व्यक्त कराव्यात असे आवाहन कक्कया सामाजिक कार्यकर्ता मंचने केले आहे.

ही बैठक संस्थेचे सचिव राजेश खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली असून यावेळी अध्यक्ष शिवलिंग व्हटकर यांच्यासह नरसिंग कावळे, रविंद्र शिंदे, शशीकांत सोनवणे, व्यंकटराव शिंदे, सूर्यकांत इंगळे, नामदेव खरटमोल, गोविंद खरटमोल, कांता तपासे, अनिरुद्ध तपासे, भगवान गन्ने, प्रल्हाद सोनवणे, संजय कावळे, सचिन शेरखाने, दत्तात्रय सोनवणे, वकील किशोर शिंदे, महेश गायकवाड, विजय खंदारे, डॉ. पी. पी. पोळ, शिवाजी सोनवणे, रूपचंद नारायकर, नरसिंगराव व्हटकर, हरिश्चंद्र कोकणे, परशुराम इंगोले, अर्जुन नांदुरे, विनोद शिंदे, उलेश खंदारे, सुनील व्हटकर, जयराम सोनवणे, सदानंद धडके, विनायक पोळ, गणेश कोकणे, हेमंत व्हटकर, प्रशांत व्हटकर, रविंद्र कदम यांच्यासह विविध मंडळांचे पदाधिकारी, समाजसेवक व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आणि बैठकीची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# जारचे पैसे घ्यायला आला..अन् चाकू हल्ल्याचा बळी ठरला

## मध्यवर्ती चौकात २७ वर्षीय तरुणावर चाकू हल्ला,महात्मा फुले चौक हादरला, दोन संशयित ताब्यात..

**भोकरदन (प्रतिनिधी) :** भोकरदन शहराच्या मध्यवर्ती महात्मा फुले चौकात मंगळवारी रात्री चाकू हल्ल्याने एकच खळबळ उडाली.पाण्याच्या जारचे पैसे वसूल करण्यासाठी आलेल्या २७ वर्षीय तरुणाला काही जुन्या वादातून वाद घातला. वाद विकोपाला गेल्यानंतर एका संशयिताने चाकूने हल्ला केल्याची थरारक घटना रात्री आठ वाजेच्या सुमारास घडली.या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून,त्याच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत.विजय साहेबराव सपकाळ (वय २७, रा. महाडा कॉलनी,भोकरदन) असे जखमी तरुणाचे नाव आहे.विजय हा वॉटर फिल्टर प्लांटवर काम करतो. नेहमीप्रमाणे पाण्याच्या जारचे पैसे गोळा करण्यासाठी तो महात्मा फुले चौकातील एका मिठाईच्या दुकानासमोर दुचाकीवरून आला होता. याचवेळी काही जणांनी त्याला अडवले. जुन्या वादाच्या कारणावरून त्यांच्यात बाचाबाची सुरू झाली.काही क्षणांतच वाद चिघळला आणि एका संशयिताने विजयवर चाकूने हल्ला केल्याचे सांगण्यात येते.हल्ल्यात गंभीर जखमी झालेला विजय जागीच खाली कोसळला. शहराच्या मध्यवर्ती चौकात अचानक घडलेल्या या प्रकारामुळे दुकानदार आणि नागरिकांची एकच धावपळ उडाली.हल्ल्यानंतर संशयित घटनास्थळावरून पसार झाले. दरम्यान, हा संपूर्ण प्रकार दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहिती असून, पोलिसांकडून फुटेजच्या आधारे हल्लेखोरांचा माग काढला जात आहे.घटनेची माहिती मिळताच भोकरदन पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी जखमी विजयला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले.

**नाकाबंदी अन् पोलिसांची झटपट कारवाई**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी शहर परिसरात तपासाची चक्रे वेगाने फिरवली. नाकाबंदी करत पोलिसांनी अवघ्या काही वेळात दोन संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. या प्रकरणी भोकरदन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून,सीसीटीव्ही फुटेज आणि उपलब्ध माहितीच्या आधारे पुढील तपास केला जात आहे.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, 'ज्ञानज्योती' व 'आधार' योजनांच्या प्रवेशाला सुधारित वेळापत्रक

**जालना - प्रतिनिधी-** सन २०२६-२७ करीता राज्यातील उत्तर माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व स्वयम् योजनेंतर्गत व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक शासनस्तरावरून प्राप्त झाले असून त्यानुसार वरील योजनांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

शासकीय वसतिगृह योजनेंतर्गत व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज करावयाचा असल्यास इच्छुकांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत अर्ज करावा.

या योजनेसाठी व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज करावयाचा असल्यास जालना महानगरपालिका हद्दीअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वयम् योजना (-) व आधार योजना (, , ) या योजनांसाठी दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

जालना जिल्ह्यातील व्यावसायीक व अव्यावसायीक अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ://.. या संकेतस्थळावर व इतर मागास बहुजन कल्याण, जालना या कार्यालयात अर्ज सादर करावीत. तसेच स्वयम् योजनेंतर्गत जालना जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, जालना यांनी केले आहे.

# आ. रोहित पवारांच्या पाठपुराव्याला यश - डिंभे-माणिकडोह बोगद्याच्या कामाला मिळणार गती

## राज्य सरकारकडून चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता ५७०४ कोटी रुपये तरतूद

**कर्जत - जामखेड (प्रतिनिधी) - :** कुकडी प्रकल्पासाठी राज्य सरकारने चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली असून ५७०४ कोटी ५० लाख रुपयांची आर्थिक तरतूदही केली आहे. यामध्ये बहुप्रतिक्षीत डिंभे-माणिकडोह या बोगद्याच्या कामाचाही समावेश आहे. गेल्या ७ वर्षांपासून कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार हे त्यासाठी पाठपुरावा करत होते. त्यांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

पावसाळ्यात डिंभे धरणातून वाहून जाणारे पावसाचे अतिरिक्त पाणी या डिंभे-माणिकडोह बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात साठवता येणार असून यामुळे कर्जतसह पारनेर, श्रीगोंदा आणि करमाळा या तालुक्यांना कुकडी प्रकल्पातून एक अतिरिक्त आवर्तन मिळणार आहे. डिंभे-माणिकडोह बोगदा करण्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता आणि तो मार्गी लावण्यासाठी आमदार रोहित पवार हे प्रयत्नशील होते. महाविकास आघाडी सरकारच्या काळातच त्यांनी या बोगद्याला मान्यता मिळवली होती. परंतु नंतर उद्भवलेल्या कोविडच्या संकटामुळे या कामाला गती देता आली नाही. पुढे राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेतून गेल्यामुळे हे काम थंड बस्त्यातच होते. तरीही तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री विखे-पाटील यांच्यासह प्रशासकीय पातळीवरही आमदार रोहित पवार हे सातत्याने पाठपुरावा करत होते. अखेर सात वर्षांनी का होईना त्यांच्या या प्रयत्नांना यश आले आहे.

या बोगद्यामुळे पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातून जाणाऱ्या राज्यातील सर्वात लांब अशा कुकडी डावा कालव्याला एक जादा आवर्तन मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. विशेष म्हणजे असे करताना पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव आणि शिरूर या तालुक्यांचा पाण्याचा कोटा अबाधित राहणार असून त्यावर कोणताही परिणाम होणार नाही. पावसाळ्यात डिंभे धरणातून वाहून जाणारे अतिरिक्त पाणी माणिकडोह धरणामध्ये साठविण्यासाठी या बोगद्याचा उपयोग होईल. माणिकडोह धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कमी पाऊस पडत असल्याने साधारणपणे हे धरण पाच वर्षातून एकदा भरते. परंतु या बोगद्यामुळे डिंभे धरणातून वाहून जाणारे पावसाचे हे अतिरिक्त पाणी बोगद्याच्या माध्यमातून माणिकडोह धरणात साठवण्यात येणार आहे. त्यामुळे हे धरण दरवर्षी भरणार असल्याने पुढील काळात कुकडी प्रकल्पासाठी पाणी कमी पडणार नाही. कर्जत-जामखेड मतदारसंघाच्या दृष्टीनेही ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. अनेक वर्षांचा हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागल्याने कर्जत तालुक्यातील कुकडीच्या लाभक्षेत्राला दरवर्षी एक अतिरिक्त आवर्तन मिळणार आहे.

# फुटबॉलच्या आकाशातील तेजस्वी तारा; लिओनेल मेस्सी

जगभरातील फुटबॉलप्रेमींसाठी ३१ ऑगस्ट २०२६ हा दिवस भावूक करणारा ठरला. अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याने तब्बल दोन दशकांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीनंतर राष्ट्रीय संघातून निवृत्ती जाहीर केली. मेस्सीने संपूर्ण फुटबॉलला अलविदा केलेला नसून, त्याचा हा निर्णय केवळ अर्जेंटिनाच्या राष्ट्रीय संघापुरता आहे. तो इंटर मियामीकडून क्लब फुटबॉलमध्ये खेळत आहे.

रोझारियोच्या मातीतून फुटबॉलच्या विश्वात आलेल्या मेस्सीने आपल्या अद्भुत कौशल्याने, अचूक पासिंगने, वेगवान ड्रिब्लिंगने आणि गोल करण्याच्या विलक्षण क्षमतेने जगाला अक्षरशः मंत्रमुग्ध केले. २००५ मध्ये अर्जेंटिनाकडून आंतरराष्ट्रीय पदार्पण केल्यानंतर त्याने २०७ सामने खेळत १२५ गोल केले. तो अर्जेंटिनाचा सर्वाधिक सामने खेळणारा आणि सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला.

मेस्सीच्या कारकिर्दीत यशाबरोबरच अपयशाचीही अनेक पाने होती. २०१४ च्या विश्वचषकातील अंतिम सामन्यातील पराभव आणि कोपा अमेरिका स्पर्धेतील अपयशानंतर त्याच्यावर मोठी टीका झाली. मात्र त्याने हार मानली नाही. २०२१ मध्ये कोपा अमेरिका, २०२२ मध्ये कतार विश्वचषक आणि २०२४ मध्ये पुन्हा कोपा अमेरिका जिंकून त्याने टीकाकारांना आपल्या कामगिरीने उत्तर दिले. २०२२ च्या विश्वचषक विजयाने तर त्याच्या कारकिर्दीला सुवर्णमुकुट मिळाला.

२०२६ च्या विश्वचषकातही मेस्सीने अर्जेंटिनाला अंतिम फेरीपर्यंत नेले. मात्र स्पेनविरुद्धच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाला पराभव पत्करावा लागला. त्यानंतर मेस्सीने राष्ट्रीय संघातून बाजूला होण्याचा निर्णय घेतला. वयाची ३९ वर्षे, प्रदीर्घ कारकीर्द आणि नव्या पिढीला संधी देण्याची वेळ आली आहे, या जाणिवेतून त्याने हा निर्णय घेतला.

मेस्सीचे महत्त्व केवळ त्याने केलेल्या गोलांमध्ये किंवा जिंकलेल्या पदकांमध्ये नाही. संघर्षातून यश मिळवता येते, टीकेला संयमाने उत्तर देता येते आणि अपयशानंतर पुन्हा उभे राहता येते, हा संदेश त्याने जगातील लाखो तरुणांना दिला. आठ वेळा बॅलन डीऑर पुरस्कार मिळवणाऱ्या मेस्सीने फुटबॉलच्या इतिहासात स्वतःचे असे स्थान निर्माण केले आहे, जे पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

मेस्सीचा अर्जेंटिनाच्या जर्सीतील प्रवास आता संपला असला तरी त्याच्या पायातील जादू आणि मैदानावरील आठवणी कायम राहतील. अर्जेंटिनासाठी त्याने दिलेले योगदान, देशाला मिळवून दिलेली विश्वचषकाची ऐतिहासिक भेट आणि फुटबॉलप्रेमींच्या मनात निर्माण केलेली असंख्य अविस्मरणीय क्षणे यामुळे मेस्सी हा केवळ एक महान खेळाडू नव्हे, तर फुटबॉलच्या इतिहासातील एक अमिट अध्याय म्हणून सदैव स्मरणात राहील.

मेस्सी राष्ट्रीय संघातून निवृत्त झाला आहे; पण त्याची जादू अजून संपलेली नाही. मैदानावरील त्याच्या पावलांचे ठसे पुसणे फुटबॉलच्या इतिहासालाही शक्य होणार नाही.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

बालस्नेही महाराष्ट्रासाठी राज्यभर विशेष अभियान; ५ सप्टेंबर ते २० नोव्हेंबरदरम्यान बालस्नेही पंचायत व बालस्नेही प्रभाग उपक्रम

# बालकांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविण्यावर भर

## महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांची माहिती

जालना (प्रतिनिधी) : बालकांचे हक्क, त्यांचे संरक्षण, शिक्षण, आरोग्य व पोषण याबाबत जनजागृती करण्याबरोबरच बालकांचा स्थानिक विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी राज्यभर बालस्नेही पंचायत आणि बालस्नेही प्रभाग हा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महिला व बाल विकास विभाग, संयुक्त राष्ट्र बाल निधी (युनिसेफ) आणि यशदा यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम ५ सप्टेंबर ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राबविला जाणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिली.

ग्रामीण भागातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये बालस्नेही पंचायत, तर नगरपरिषद, नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या क्षेत्रात बालस्नेही प्रभाग ही संकल्पना प्रत्यक्षात आणली जाणार आहे. बालकांचे विचार, मते, कल्पना आणि समस्या जाणून घेऊन त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे, तसेच त्यांच्यात नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना आणि सकारात्मक विचार विकसित करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या अभियानांतर्गत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध उपक्रम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये बालस्नेही पंचायत व बालस्नेही प्रभाग प्रतिज्ञेचे आयोजन, बालस्नेही ठराव मंजूर करणे, ग्रामपंचायत अथवा प्रभाग विकास आराखड्यात बालकेंद्रित विकासाच्या बाबींचा समावेश करणे, तसेच बालसभा घेण्याचा समावेश आहे. याशिवाय बालहक्क आणि बालसंरक्षणाबाबत जनजागृतीपर कार्यक्रम, ग्रामस्तरीय बालकल्याण व संरक्षण समिती तसेच प्रभागस्तरीय बालकल्याण व संरक्षण समिती सक्रिय करण्यावरही विशेष भर दिला जाणार आहे.

बालस्नेही गाव/प्रभाग प्रतिज्ञेच्या माध्यमातून प्रत्येक बालकाचे हक्क जपण्याचा आणि त्यांचा सन्मान करण्याचा संकल्प केला जाणार आहे. प्रत्येक मुला-मुलीला शिक्षणाचा हक्क मिळवून देणे, बालविवाह व बालमजुरीला पूर्णपणे विरोध




करणे, मुलांना सुरक्षित व भयमुक्त वातावरण उपलब्ध करून देणे, त्यांच्या आरोग्य व पोषणासाठी प्रयत्न करणे आणि ग्राम व प्रभाग विकासामध्ये बालकांचा सक्रिय सहभाग वाढविणे, या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. विकसित भारत २०४७ च्या संकल्पनेशी सुसंगतपणे बालकांना आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य मिळावे, त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव व्हावी आणि भविष्यातील जबाबदार नागरिक म्हणून त्यांची जडणघडण व्हावी, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

बालकांचा आवाज ऐकून त्यांना विकास प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी या माध्यमातून स्थानिक पातळीवर व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या अभियानाचा समारोप बाल संसद, मुंबई येथे करण्यात येणार आहे.

५ सप्टेंबर ते २० नोव्हेंबर या कालावधीत उपक्रमाची प्रभावी व यशस्वी अंमलबजावणी करणाऱ्या उत्कृष्ट बालस्नेही ग्रामपंचायती, नगरपरिषदा, नगरपालिका आणि महानगरपालिकांना प्रशस्तीपत्र व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. सशक्त बालक सशक्त गाव / प्रभाग सशक्त देश या संकल्पनेतून राबविण्यात येणारे हे अभियान बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या सहभागातून बालस्नेही महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरणार असल्याचे डॉ. संजय लाखेपाटील यांनी सांगितले.

# नांदेडला वाहतूक समस्या आहेच ; शहराला बससेवा सुरळीत मिळावी - गजानन जोशी

**नांदेड - प्रतिनिधी-** शहरातील बससेवा का बंद झाल्या ज्या नियमितपणे जनतेसाठी सेवा देत होत्या,नांदेड महानगरपालिका जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनिवल मिशन अंतर्गत प्राप्त झालेल्या बसेस अडगळीत पडल्या असल्याची माहिती समोर येत असताना,ती बंद पडलेली बस सेवा सुरू करणेसाठी लोकप्रतिनिधी पुढाकार घेताना दिसून येत नाहीत.

केंद्र सरकारच्या () मार्फत सुरू असलेल्या वाहतूक सर्वेक्षणाच्या आधारे महाराष्ट्र शासन सर्वसमावेशक वाहतूक आराखडा ( ) तयार करणेसाठी एक पथक नांदेड शहरात आल्याचे वृत्त समजले,परन्तु वर्तमानस्थितीत असे सर्वे करण्याची आवश्यकता होती का? हा प्रश्न जनतेतून चर्चिला जातो आहे,यापेक्षा वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण व वाहतूक उप-अधिक्षक कार्यालय नांदेड मिळणेसाठी प्रयत्न केला तर निश्चितच वाहतूक नियंत्रणासाठी पुरेपूर यंत्रणा व योग्य दिशा असलेले वाहतूक पोलीस उपलब्ध होतील. प्रतिवर्षी वाहतूक पोलिसांनी वॉर्म कॅमेरे दिले जातात,परन्तु ते फोटोपुरते किंवा निधी खर्च करणे पुरतेच असतात का? असाही प्रश्न उपस्थित होतो आहे. बससेवा सुरळीत झाली तर शहरातील रस्त्यांवर अतिरिक्त वाहनांची संख्या कमी होईल आणि वाहतूक नियंत्रणाचा मार्ग सुकर होईल. शहरात हजारो रिक्षाचालक,हजारो चारचाकीचालक,लाखो दुचाकीस्वार नियमित प्रवास करत असतील तर निश्चितच वाहतूक समस्या उद्भवणारच ना! हीच जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था रूपाने जर बसेस उपलब्ध झाल्या तर निश्चितच वाहतूक नियंत्रणासाठी खूप मोठी मदत होईल. नांदेड शहरात खासदार,आमदार,महापौर, नगरसेवक व सर्व पक्षीय नेतेमंडळी असे विविध लोकप्रतिनिधी असलेले व्यक्ती या महानगरात निवासी असतात,परन्तु त्यांना कुणालाही गत ५,६ वर्षांपासून बंद असलेली बससेवा का निदर्शनास आली नाही.

# रोटरी क्लबच्या पुढाकारातून सहाशे; क्षयरुग्णांना पोषण आहार किट वाटप

## एसआरजे पित्ती स्टीलच्या सीएसआर निधीतून उपक्रम; ‘प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानाला’ बळ

**जालना-प्रतिनिधी**

भारत सरकारने २०३० पर्यंत देश क्षयरोगमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यासाठी ‘प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियान’ प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत उपचाराखाली असलेल्या क्षयरुग्णांना औषधोपचारासोबतच पोषण आहार मिळावा, यासाठी कम्युनिटी सपोर्ट ऑफ टीबी पेशंट’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला प्रतिसाद देत रोटरी क्लब ऑफ जालनाच्या पुढाकारातून



जिल्ह्यातील बुधवार दि. २ सप्टेंबर रोजी ६०० क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले.

जालना जिल्ह्यातील उपचाराखाली असलेल्या क्षयरुग्णांसाठी एस.आर. जे. पित्ती स्टील जालना यांच्या सीएसआर निधीतून या पोषण आहार किटची उपलब्धता करून देण्यात आली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकृष्णकांत कनवारीया यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती हॉल येथे उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनिषा दांडगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात ६०० क्षयरुग्णांना कोरड्या पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. यावेळी एस.आर.जे. पित्ती स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक यशराज पित्ती, रोटरी क्लब ऑफ जालनाचे अध्यक्ष प्रशांत महाजन, माजी अध्यक्ष वर्षा पित्ती, तसेच रोटरी क्लबचे सदस्य रमेश मगरे, हेमंत ठक्कर, डॉ. दीपक बगडिया आणि रवी भक्कड यांच्या हस्ते व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. जी. एम. कुडलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पोषण आहाराच्या किट वाटप करण्यात आल्या.

यावेळी बोलताना जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. जी. एम. कुडलीकर यांनी सांगितले की (पान २ वर)

# डॉ. भताने’ज छाया फाउंडेशनतर्फे जिल्हा कारागृहात वैद्यकीय तपासणी व उपचार शिबिर

### डॉ. गोविंद भताने यांच्या पुढाकारातून १५० बंदींची आरोग्य तपासणी

**जालना । प्रतिनिधी**

समाजातील प्रत्येक घटकापर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने डॉ. भताने’ज छाया फाउंडेशन, जालना व जालना हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कारागृह वर्ग-१, जालना येथे दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी रिमांड बंदी तसेच इतर बंदींसाठी वैद्यकीय तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ. गोविंद भताने यांच्या पुढाकारातून आयोजित या शिबिरात एकूण १५० बंदींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

जिल्हा कारागृह अधीक्षक श्री. प्रवीण विभांडीक यांनी डॉ. भताने’ज छाया फाउंडेशनकडे पत्राद्वारे वैद्यकीय तपासणी शिबिर आयोजित करण्याची विनंती केली होती. त्यानुसार जिल्हा कारागृह प्रशासनाच्या पुढाकाराने हे शिबिर आयोजित करण्यात आले.

शिबिरामध्ये बंदींची दंत तपासणी, त्वचारोग तपासणी तसेच विविध आजारांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून आवश्यकतेनुसार उपचार, औषधोपचार तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. तसेच तोंडाचे आरोग्य, तंबाखू व गुटखा सेवनाचे दुष्परिणाम, वैयक्तिक स्वच्छता, नियमित आरोग्य तपासणी आणि निरोगी जीवनशैली याबाबत आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. या शिबिरासाठी डॉ. भताने’ज छाया फाउंडेशनचे संचालक डॉ. गोविंद भताने, तसेच जालना हॉस्पिटलचे डॉ. प्रदीप हुसे, डॉ. लक्ष्मण मुंडे, डॉ. आघाव व डॉ. शीतल यांचे मार्गदर्शन व वैद्यकीय सहकार्य प्राप्त झाले. जालना हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथक व इतर कर्मचाऱ्यांनीही शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा कारागृह अधीक्षक श्री. प्रवीण विभांडीक, तुरुंग अधिकारी श्री. उखळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे, औषधनिर्माता श्री. नेटके तसेच कारागृह कर्मचारी मुकुंद जाधव, नामदेव कोळी, कृष्णा मोरे, अशोक कटकडे व सुभेदार पातकळ यांचे विशेष सहकार्य प्राप्त झाले. यावेळी वैद्यकीय पथकाने बंदींशी संवाद साधून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या. आवश्यकतेनुसार संबंधित बंदींना पुढील उपचारासाठी वैद्यकीय सल्ला व संदर्भ देण्यात आला.

‘‘आरोग्य ही प्रत्येक व्यक्तीची मूलभूत गरज आहे. समाजातील गरजू व वंचित घटकांप्रमाणेच बंदींपर्यंतही आवश्यक आरोग्यसेवा पोहोचणे महत्त्वाचे आहे. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी डॉ. भताने’ज छाया फाउंडेशन यापुढेही सातत्याने कार्यरत राहील,’’ असे फाउंडेशनचे संचालक डॉ. गोविंद भताने यांनी सांगितले. या वैद्यकीय तपासणी व उपचार शिबिरामुळे जिल्हा कारागृहातील १५० बंदींना आरोग्य तपासणी, आवश्यक उपचार, औषधोपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध झाली. बंदींच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला.

सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम आरोग्य, शिक्षण, सामाजिक जनजागृती तसेच गरजू घटकांसाठी विविध लोकहिताचे (पान २ वर)

# परतूर च्या विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश



**परतूर - प्रतिनिधी -** परतूर येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत विवेकानंद इंग्लिश स्कूल परतूर च्या विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्वाची छाप पाडत घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत दक्ष मेहता आणि अलिझा पठाण यांनी उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांना मोलाचे मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शक शिक्षिका जोबीना मॅडम आणि काळे मॅडम. यांचे अत्यंत महत्त्वाचे योगदान राहिले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून उत्कृष्ट तयारी करून घेतल्यामुळेच विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले, अशा भावना व्यक्त होत आहेत.या घवघवीत यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष, संदीप शे.बाहेकर.विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक भालचंद्र महाजन, विवेकानंद पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक श्विजयकुमार दंदाले आणि शाळेतील सर्व शिक्षक वृंदांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे, तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# छत्रपती संभाजीनगर येथे ७ सप्टेंबरला डाक अदालत डाक सेवेसंदर्भातील तक्रारी ४ सप्टेंबरपूर्वी पाठविण्याचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी-** भारतीय डाक विभागाच्या छत्रपती संभाजीनगर विभागामार्फत नागरिकांच्या डाक सेवेशी संबंधित तक्रारींच्या निवारणासाठी सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. ही डाक अदालत प्रवर अधीक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर ४३१००१ यांच्या कार्यालयात होणार आहे.

देशातील प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन सामाजिक व आर्थिक जीवनात डाक सेवेला महत्त्वाचे स्थान आहे. नागरिकांना डाक सेवा देताना संभाषणामध्ये, पत्रव्यवहारामध्ये किंवा सेवेमध्ये काही त्रुटी अथवा अडचणी निर्माण झाल्यास त्यासंदर्भातील तक्रार करण्याची संधी डाक विभागाकडून देण्यात येते. अशा तक्रारींचे योग्य प्रकारे निवारण करण्याच्या उद्देशाने डाक अदालत आयोजित करण्यात येत असल्याचे विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

या डाक अदालतीमध्ये डाक विभागाशी संबंधित डाक सेवेबाबतच्या तक्रारी तसेच कामकाजाबाबतच्या तक्रारींचा विचार केला जाणार आहे. विशेषतः टपाल वस्तू, मनी ऑर्डर, बचत बँक खाते, प्रमाणपत्रे आदी डाक सेवांशी संबंधित तक्रारी डाक अदालतीत विचारार्थ घेतल्या जाणार आहेत. तक्रारदारांनी आपल्या तक्रारीत संबंधित प्रकरणाचा संपूर्ण तपशील स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. तसेच तक्रारीचा संदर्भ क्रमांक, दिनांक व इतर आवश्यक माहिती उपलब्ध असल्यास ती नमूद करून तक्रार पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

डाक सेवेसंदर्भातील तक्रारी ‘प्रवर अधीक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर ४३१००१’ या नावे ४ सप्टेंबर २०२६ पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात. तसेच ४ सप्टेंबरनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची डाक अदालतीत दखल घेतली जाणार नाही, असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

त्यामुळे (पान २ वर)

# शहापूर व धाकलगाव येथे जलद एस.टी. बसेसना अधिकृत थांबा द्या ; एस.टी.महामंडळाकडे प्रवाशांची मागणी

## विद्यार्थी,महिला व ज्येष्ठ नागरिकांची मोठी गैरसोय ; खासगी वाहतुकीमुळे आर्थिक भुर्दंड

**वडीगोद्री - प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील शहापूर आणि धाकलगाव येथे जालना व बीडकडे जाणाऱ्या सर्व जलद एस.टी.बसेसना अधिकृत थांबा मंजूर करण्यात यावा,अशी आग्रही मागणी परिसरातील शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान,ग्रामस्थ व प्रवाशांच्या वतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे (एस. टी.)निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या संदर्भातील लेखी निवेदन जालना विभागाचे विभाग नियंत्रक सुरेश टकले तसेच जिल्हाधिकारी कार्यालय,जालना येथे सादर करण्यात आले आहे.

**विद्यार्थी व प्रवाशांचे अतोनात हाल**

अंबड तालुक्यातील शहापूर व धाकलगाव ही अत्यंत महत्त्वाची गावे असून या गावांशी लगतच्या अनेक खेड्यांचा दैनंदिन संपर्क आहे.शहापूर येथे दाढेगाव,रेवलगाव,बारसवाडा,मठ तांडा तर धाकलगाव येथे शोभानगर,पिठोरी शिरसगाव,नवीन पिठोरी शिरसगाव यांसह पंचक्रोशीतील हजारो



नागरिक,विद्यार्थी,शेतकरी,कामगार,महिला व ज्येष्ठ नागरिक शिक्षण,रोजगार,आरोग्यसेवा आणि प्रशासकीय कामकाजासाठी जालना,अंबड,गेवराई व बीड येथे दररोज प्रवास (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.